Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 122B : Implementation and Impacts of Goods & Service Tax (GST) on Indian Economy
2348-7143
Feb.
2019

# कर प्रणालीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम

डॉ. बी.एम. बिरादार
वणिज्य विभाग, श्री गुरुबुध्दी स्वामी कॉलेज, पूर्णा, जि. परभणी.

सारांश

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर ७२ वर्षांच्या प्रतिक्षेनंतर एकसंघ कर प्रणाली १ जुलै २०१७ पासून संपूर्ण भारतात वस्तू व सेवाकर कायदा अस्तित्वात आला. या कायद्यावर भारतीय राज्यघटनेनंतर सर्वात जास्त चर्चा झाली. १३० कोटी लोकसंख्या असलेल्या भारत देषात जवळपास ५०० कायदे एकत्रित करून एकच वस्तू व सेवाकर कायदा लागू करण्यात आला व भारताचे अषक्यप्राय स्वप्न अखेर पूर्ण झाले. भारतातील ३१ राज्य व ५ केंद्रषासीत प्रदेषात हा कायदा अस्तित्वात आला. भारतात प्रत्येक वस्तू व सेवांवर समानकर आणि समान दर प्रणाली सत्यात उतरली. अषा जीएसटी मुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल व अनुकूल परिणाम झाले. यावर प्रकाष टाकण्याचा प्रयत्न या षोधनिबंधात करण्यात आलेला आहे. यासाठी दुय्यम तथ्य संकलनाचा उपयोग केलेला आहे.

प्रस्तावना

वस्तू व सेवाकर कायद्याच्या रुपाने भारतातएकसंघ करप्रणाली अस्तित्वात आलेली आहे. जीएसटी कर प्रणाली १ जुलै २०१७ रोजी सर्व भारतात अंमलात आली. त्यामुळे प्रत्येक राज्यातील कर प्रणालीतील तफावत दूर होवून सामान्य नागरिकांना स्वस्त व योग्य दरात वस्तू मिळवणे षक्य झालेले आहे. हा कायदा करण्यासाठी यापूर्वी असलेले अनेक कायदे जसे, केंद्रिय उत्पादन षुल्क, विषेश अतिरिक्त सिमाषुल्क अधिभार, अतिरिक्त उत्पादन षुल्क, सेवाकर, अतिरिक्त सीमा षुल्क, सेस अधिभार इ. केंद्र सरकारचे अप्रत्यक्ष कर तसेच मूल्यवर्धित कर, केंद्रिय विक्री कर, करमणूक कर, ऐषआराम कर, लॉटरी कर, उस खरेदी कर, प.वेष कर, आणि स्थानिक संस्थांचे जकात कर इ. राज्य सरकारचे अप्रत्यक्ष कर एकत्रित करून नवीन वस्तू व सेवाकर कायदा अस्तित्वात आला आहे. त्यामुळे केंद्र व राज्यांना वेगवेगळा कर देण्याची आवष्यकता राहिलेली नाही. परिणामी भारतातील कर दात्याची संख्या वाढलेली असून केंद्र सरकारच्या महसुलामध्ये देखील वाढ झालेली आहे. ळैज कर प्रणालीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल व अनुकूल परिणाम झालेले आहेत. त्याचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

वस्तू व सेवा कराचे अर्थव्यवस्थेवरील परिणाम

वस्तू व सेवा कर प्रणालीचा स्वीकार समस्त भारताने केला. सध्या जीएसटीची सुरुवात असल्यामुळे त्याची अंमलबजावणी करण्यात अडचणी निर्माण होत आहेत. परंतु त्याचे परिणाम मात्र आता पासूनच दिसून येत आहेत. जीएसटीचा परिणाम केंद्र सरकार, भारतीय अर्थव्यवस्था व नागरिकांवर दिसून येत आहे. याचबरोबर भारतातील व्यवसाय, उद्योग, सेवाक्षेत्रावर परिणाम झालेला दिसून येतो. सर्व सामान्यपणे कोणतीही नवीन बाब सुरु केल्यानंतर काही अनुकुल व प्रतिकूल परिणाम होत असतात. ते परिणाम पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. **एकत्रित कर प्रणाली** – जीएसटी कर प्रणालीमुळे राज्य सरकार व केंद्र सरकार व स्थानिक कर आकारण्यात येणारे विविध कर संपुष्टात येवून एकच कर प्रणाली जीएसटी च्या रुपाने संपूर्ण भारतात अस्तित्वात आली. त्यामुळे भारतातील व्यापारी व व्यावसायिकांना वेगवेगळ्या कर प्रणालीमधून सुटका मिळाली आहे. या कर प्रणालीमध्ये सर्व कराचा समावेष करून एकसंघ कर प्रणाली लागू करण्यात आलेली आहे. परिणामी कर भरणा सहज षक्य होत आहे.

२. **महसुलामध्ये वाढ** – वस्तू व सेवाकरात लहान, मध्यम व मोठ्या व्यावसायिकांना समाविश्ट केल्यामुळे जीएसटी कर भरणा–यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या महसुलामध्ये वाढ होवून केंद्र सरकारच्या उत्पन्नात वाढ झालेली आहे. त्यामुळे देषातील विकास कार्यास लागणा–या वित्तीय साधनात मोठी वाढ झालेली आहे. परिणामी विकास कार्यासाठी निधी उपलब्ध झाला आहे.

३. **पारदर्शी दर पध्दती** – जीएसटी कर प्रणालीमध्ये वस्तू व सेवांचा विचार करून कराचे दर निष्चित केलेले आहेत. त्यामुळे कर प्रणालीमध्ये पारदर्षकता निर्माण झालेली असून कराचे दर निष्चित करताना अत्यंत आवष्यक वस्तूंवर षून्य टक्के कमी आवष्यक वस्तू व सेवांवर ५ टक्के तर काही वस्तू व सेवांवर १२ ते २८ टक्के पर्यंत कर आकारले आहे. याचाच अर्थ कराचे दर निर्धारित करत असताना सर्व उत्पन्न गटाचा व वस्तू व सेवांचा विचार केलेला आहे.

४. **व्यापार व व्यवसायाला चालना** – जीएसटी ही समान कर प्रणाली लागू झाल्यामुळे राज्यातील व्यापाराला, व्यवसायाला व उद्योगाला चालना मिळाली असून देषभरात एकच करप्रणाली अंगीकृत झाल्याने देषात एकसंध बाजारपेठ निर्माण होण्यास मदत झालेली आहे. परिणामी व्यापार व व्यवसायास चालना प्राप्त झालेली आहे व निर्यातदाराला त्याने निर्यातीसाठी वापरलेल्या सर्व खरेदीमालावर दिलेल्या कराचा परतावा मिळणर असल्यामुळे निर्यातीवर कोणतेही कर आकारले जाणार नसल्यामुळे आंतरराश्ट्रीय पातळीवर त्याला स्पर्धा करणे षक्य होते.

५. **ग्राहकाचा फायदा** – वस्तूची किंमत देताना वस्तूवरील कर हा किंमतीचा एक भाग असतो. कराचा दर जास्त असल्यास वस्तूची किंमत देखील जास्त राहील. जीएसटी कर प्रणाली पूर्वी अप्रत्यक्ष कर पध्दतीमुळे वस्तूच्या विक्री किंमतीवर पुन्हा कराची आकारणी केली जात होते. परंतु जीएसटी मध्ये करावरील कराची आकारणी होत नाही. त्यामुळे वस्तूची किंमतीतील कर कमी होवून वस्तू स्वस्त होतील व त्याचा फायदा ग्राहकांना होत आहे याचा अर्थ स्वस्त किंमतीमध्ये ग्राहकांना वस्तू प्राप्त होतात व खर्चात बचत होत आहे.

६. **नफाखोरीस प्रतिबंध** – कोणत्याही राज्यातून खरेदी केली तरी जीएसटी मध्ये समान कर आकारणी केली जाते. त्यामुळे परराज्यातून वस्तू खरेदी करून व जास्त किंमतीमध्ये विक्री करून नफाखोरी करणे जीएसटी मुळे बंद झालेले आहे आणि संपूर्ण भारतात वस्तू व सेवा एकच दर होऊन सामान्य ग्राहकाची फसवणूक करणे आता षक्य होणार नाही. त्याचबरोबर कराच्या दरातील घटीच्या प्रमाणात वस्तूंच्या किंमती कमी करून त्याचा फायदा ग्राहकांना देणे अषी तरतूद जीएसटी कायद्यात करण्यात आली आहे.

७. **हिषोब ठेवणे बंधनकारक** – जीएसटी प्रणाली मध्ये विवरणपत्र भरणे, सेटऑफ घेणे या नियमांमुळे प्रत्येक व्यावसायिकाला हिषोब नियमित व सतत ठेवणे बंधनकारक झालेले आहे. त्यामुळे [illegible], नफातोटा पत्रक व व्यापारी खाते पत्रकास विष्वसनीयता



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261
Special Issue 122B : Implementation and Impacts of Goods & Service Tax (GST) on Indian Economy | Feb. 2019

वाढ आहे. सेटऑफ पध्दतीमुळे वेळेवर रिटर्न भरावे लागतील. त्यामुळे हिशोब वेळेवर पूर्ण करावे लागत आहेत.

८. **न्याय व्यवस्थेत सुधारणा** – द्वविध राज्यात वेगवेगळी कर प्रणाली असल्यामुळे न्याय व्यवस्था अत्यंत किचकट झाली होती. परंतु जीएसटी च्या प्रणालीमुळे संपूर्ण देशात एकसंघ करप्रणालीचा उपयोग झाल्यामुळे करदात्यांना न्याय देताना विसंगती दूर होवून त्यात सुधारणा झालेली आहे व सर्वासाठी एकच न्याय ही पध्दत जीएसटीप्रणाली मुळे षक्य झालेले आहे. थोडक्यात व्यापारी व व्यावसायिकांना न्याय मिळवणे सोपे व सोईचे झालेले आहे.

९. **व्यावसायिक स्पर्धेमध्ये प्रामाणिकपणा** – विविध कर लागू असूनही कर न भरणारे व्यापारी आपली वस्तू व सेवा कमी दरात वस्तू व सेवांची विक्री करुन अतिरिक्त नफा प्राप्त करित होता. त्यामुळे प्रामाणिक व्यावसायिकांना त्यांचा परिणाम भोगवा लागत होता. परंतु जीएसटी प्रणालीपुळे सर्वांना कर भरणे बंधनकारक झालेले आहे. त्यामुळे प्रामाणिक व्यावसायिक देखील स्पर्धा करुन व्यवसाय वाढवू षकतात म्हणजेच त्यांना व्यवसायाची संधी निर्माण होते.

१०. **जी.एस.टी. काउंसील** – जीएसटी काउंसील ही एकच संस्था नियंत्रक असल्यामुळे अधिसूचना, परिपत्रके नियम इ. बाबत एकसमानता निर्माण होईल. त्यामुळे कर प्रणालीवर एकच नियंत्रक मंडळाचे नियंत्रण राहील. त्यामुळे राज्य व केंद्र सरकारच्या सहमतीनुसार नियम व निर्णय घेउन त्यांची अंमलबजावणी संपूर्ण देषात एकाच वेळी करता येणे षक्य झालेले आहे.

११. **कर संग्रहण सुलभ** – वस्तू व सेवाकर प्रणाली संगणकीकृत असल्यामुळे ऑनलाईन पध्दतीने कर संग्रहण सुलभ झालेले आहे. कारण प्रत्येक व्यावसायिकास जीएसटी क्रमांक ऑनलाईनद्वारे प्राप्त करावा लागतो. त्याचबरोबर कर आकारणी देखील संगणकाच्या माध्यमातून प्राप्त होते. त्यामुळे सर्वच करदाते एकाच वेळेस व एकाच तारखेस कराचा भरणा करतात. त्यासाठी देखील ई-बँकिंगचा वापर केला जातो. त्यामुळे कर भरणे व परतावा मिळवणे सुलभ झाले आहे.

१२. **वस्तू व सेवाकर प्रणालीचा स्विकार** – जीएसटी कार्य प्रणालीचा स्विकार भारतातील सर्व राजकीय पक्ष व सर्व राज्य सरकारने सहजतेने केलेले आहे व यासाठी कोणीही विरोध केला नाही. परंतु त्यांनी काही सूचना केल्या व त्या सूचना उपयोगी करुन ळैज प्रणाली अस्तित्वात आलेली आहे. म्हणून व्यापारी, व्यावसायिक, उद्योजक व नागरिकांनी जीएसटी चा स्विकार केलेला आहे. त्याचे सकारात्मक परिणाम काही वर्षात दिसून येणार आहे.

वरीलप्रमाणे जीएसटी प्रणालीचे परिणाम भारतातील व्यापार, व्यवसाय, ग्राहक व नागरिकांवर झालेला दिसून येतो. याचबरोबर भारतीय अर्थव्यवस्थाही प्रगतीकडे वाटचाल करित असून जगातील सहाव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून मान्य पावलेली आहे. त्यामुळे अनेक वर्षाची इच्छा व आकांक्षा ळैज प्रणालीमुळे भारतीय नागरिकांची पूर्ण झालेली आहे.

**निष्कर्ष**

नोटबंदी व जीएसटी प्रणालीचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर दिसून येत आहे. जीएसटी प्रणालीमुळे केंद्र सरकारच्या महसूल प्राप्तीमध्ये वाढ झालेले असून हा महसूल खर्चाचा ताळमेळ बसवण्यासाठी सहाय्यक आहे. याच बरोबर भारतातील नागरिक मध्यम उत्पन्नाचे असून त्यांना जीएसटी मुळे कमी दरात चांगल्या व दर्जेदार वस्तू प्राप्त होत आहेत. याचाच अर्थ जीएसटीप्रणाली यापूर्वीच लागू करणे आवष्यक होते. विकासाच्या दृष्टीने जीएसटी प्रणाली अत्यंत महत्त्वपूर्ण असून उपयोगी सिध्द होत आहे.

संदर्भ

१. वस्तू व सेवाकर कायदा– सुरेंद्र मानकोसकर.
२. वस्तू व सेवा कर– यशोमुद्रा प्रकाशन.
3. www.mahavat.gov.in
4. www.gst.gov.in
5. www.gstcouncil.gov.in
6. www.cbec.gov.in
७. करनीती, २६९ – सी.ए. उमेष शर्मा, दै. लोकमत दि. २२.१.२०१९.१

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani